POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१७० ● मुंबई, बुधवार, २१ जानेवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## १५०० नको नोकऱ्या द्या, वाढवण, मुरबे प्रकल्प रद्द करा

### पालघरमधील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या लाँग मार्च आज जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार







■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

पालघरमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने भव्य पायी मोर्चा काढला आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या लॉन्ग मार्चचा आज दुसरा दिवस आहे. मुंबई–अहमदाबाद महामार्गावरील डहाणूच्या चारोटीहून या भव्य मोचार्ला सुरूवात झालीये, हा मोर्चा मासवण येथे मुक्कामी आहे. तर आज पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर हा मोर्चा धडकणार आहे. पालघरमधील वाढवण प्रकल्प रद्द करावा, पिण्यासाठी आणि सिंचनासाठी पाण्याची सोय करावी, यासह अन्य प्रमुख मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात आला आहे, या मोर्चात जवळपास ५० हजार नागरिक सहभागी झाल्याची माहिती आहे. जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत अनिश्चित काळासाठी पालघर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा आंदोलकांनी दिलाय. आम्हाला सरकारचे पंधराशे रुपये नको आमच्या मुलांना नोकऱ्या आणि रोजगार द्या, मागण्या मान्य झाल्या नाहीत तर आमचा मोर्चा मुंबईकडे वळवू, रेल रोकोही करू असा इशाराही आंदोलकांनी दिला आहे.

**मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा लॉन्ग मार्च आत्ता पालघरकडे**

रवाना व्हायला सुरुवात झाली असून आज संध्याकाळपर्यंत हे लाल वादळ जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. जर का आमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर आम्ही मंत्रालयाकडे आगेकूच करू अन्यथा रेल रोकोही करू, असा इशारा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या आमदार विनोद निकोले यांनी दिला आहे.

## पालघरमधील विविध प्रकल्पांविरुद्ध संघटनांचा आक्रोश मोर्चा

■पालघर। प्रतिनिधी,

पालघर जिल्ह्यात होणाऱ्या वाढवण बंदर, चौथी मुंबई आणि जिंदाल बंदर या प्रकल्पांमुळे स्थानिक नागरिकांचे सर्व प्रकारे नुकसान होणार आहे. त्यामुळे हे सर्व प्रकल्प रद्द करा या मागणीसाठी जिल्ह्यातील विविध संघटनांनी सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर 'आक्रोश मोर्चा' काढण्यात आला. जिल्ह्यातील मच्छीमार, शेतकरी आणि आदिवासी संघटनांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट 'आक्रोश मोर्चा' काढला. ठाणे जिल्हा मच्छीमार समाज संघापासून सुरू झालेला हा मोर्चा हुतात्मा स्मारकामार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकल्यानंत तेथेच कष्टकरी संघटनेचे बेमुदत आंदोलन सुरू झाले आहे. वाढवण बंदर रद्द करा, चौथी मुंबई नको, अदानी हटाओ, गाव वाचवा अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या. वाढवण बंदर, चौथी मुंबई, जिंदाल बंदर आणि रिलायन्स टेक्सटाईल पार्क यांसारख्या प्रकल्पांमुळे पालघरच्या अस्तित्वावर घाला घातला जात असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. या प्रकल्पांमुळे २० हजार मच्छीमारांची रोजीरोटी आणि ५ हजार घरांवर गंडांतर येणार आहे. यासाठी ७ कोटी टन दगड आणि २० कोटी घनमीटर वाळू वापरली जाणार असून डोंगर आणि जलस्त्रोत नष्ट होतील. १९ जून २०२५ च्या शासन निर्णयानुसार ११० आदिवासी गावे 'विकास केंद्रा'साठी घोषित केली आहेत. यामुळे आदिवासींचा घटनादत्त 'पेसा' अधिकार धोक्यात आला आहे. अदानी समूहाकडून डहाणू खाडी, थर्मल पॉवरची जमीन आणि सिमेंट प्लांटद्वारे परिसरातील गावे गिळंकृत केली जात असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. दहा हजाराहून अधिक नागरिकांनी सहभाग घेतलेला हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचल्यानंतर, त्याचे रूपांतर सभेत झाले. त्यानंतर कष्टकरी संघटनेने त्याच ठिकाणी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत उपोषण सुरू केले. या आंदोलनात ठाणे जिल्हा मच्छिमार समाज संघ, वाढवण बंदर विरोधी संघर्ष समिती, कष्टकरी संघटना, भूमी सेना, महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती, नॅशनल फिशवर्कर्स फोरम आणि विविध ग्रामपंचायतींचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.



## कुर्ल्यात विविध परिसरातील ७१ अनधिकृत बांधकामांचे निष्कासन

कुर्ला (पश्चिम) येथील विविध परिसरातील पदपथावरील अनधिकृत दुकाने तसेच दुकानांची वाढीव बांधकामे अशा एकूण ७१ बांधकामांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ह्यएलह्ण विभागाकडून आज (दिनांक २० जानेवारी २०२६) निष्कासनाची कारवाई करण्यात आली. बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी यांच्या निदेर्शानुसार, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनात, सह आयुक्त (परिमंडळ-५) श्री. देविदास क्षीरसागर यांच्या देखरेखीत, सहायक आयुक्त (एल विभाग) श्री. धनाजी हेर्लेकर यांच्या नेतृत्वात ही कारवाई हाती घेण्यात आली होती. कुर्ला (पश्चिम) येथील कुर्ला रेल्वे स्थानक परिसर, न्यू मिल मार्ग, बैल बाजार परिसर, विनोबा भावे नगर आदी परिसरात ही कारवाई करण्यात आली. या अंतर्गत, या परिसरातील अनधिकृत फेरीवाले, पदपथावरील अनधिकृत दुकाने तसेच दुकानांची वाढीव बांधकामे अशा एकूण ७१ बांधकामांचे निष्कासन करण्यात आले. यामध्ये, कुर्ला पोलिस ठाणे हद्दीतील ५३ आणि विनोबा भावे नगर पोलिस ठाणे हद्दीतील १८ असे एकूण ७१ अनधिकृत फेरीवाले, दुकाने व दुकानांचे वाढीव बांधकाम यांचा समावेश आहे. अतिक्रमण निर्मूलनाची ०४ वाहने, ०२ जेसीबी आणि अन्य संयंत्राच्या सहाय्याने हे निष्कासन करण्यात आले. या कारवाईदरम्यान महानगरपालिकेचे ४६ अधिकारी-कर्मचारी यांच्यासह पुरेसा पोलिस बंदोबस्त नेमण्यात आला होता. दरम्यान, सदर परिसरातील अनधिकृत तसेच नियमांचे पालन न करणाऱ्या रिक्षा चालकांविरोधात सक्तीची कारवाई करण्याबाबत ह्यएलह्ण विभागाकडून संबंधित पोलिसांना कळविण्यात आले आहे. तसेच, यापुढेही अनधिकृत बांधकामांविरोधात निष्कासनाची कारवाई सुरूच राहील, असे महानगरपालिका प्रशासनाकडून कळविण्यात येत आहे.

## मुंबई एअरपोर्टवर सोनं तस्करीच्या नव्या 'जुगाड'चा पर्दाफाश!

### ₹.२.१५ कोटींचे सोने जप्त, बांगलादेशी प्रवाशासह एक कर्मचारी अटकेत

■मुंबई । प्रतिनिधी,

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी आंतरराष्ट्रीय सोन्याच्या तस्करीचे मोठे रॅकेट उघडकीस आणले आहे. गुप्त माहितीच्या आधारे केलेल्या कारवाईत बांगलादेशी प्रवासी आणि विमानतळावरील कंत्राटी कर्मचारी अशा दोघांना अटक करण्यात आली आहे.

**फक्त ३० हजारांसाठी**

सकपाळने चौकशीत हे सोने दुबईहून आलेल्या बांगलादेशी प्रवासी रकिबूर रहमान याच्या मार्फतच आल्याचा खुलासा केला. तर, रहमाननेही सोन्याच्या तस्करीची कबुली दिली असून, हे सोने तिसऱ्या व्यक्तीच्या सांगण्यावरून आणल्याचे सांगितले आहे. सोनं स्वीकारण्यासाठी सकपाळला ३० हजार रुपये देण्याचे ठरले होते, अशी माहिती कस्टम्स अधिकाऱ्यांनी दिली.

**तस्करीची ही पद्धत रोखली नाही तर...**

विमानतळातील प्रवेशाधिकाराचा गैरवापर करून केलेली ही तस्करी सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर बाब असल्याचे अधिकाऱ्यांनी नमूद केले. या प्रकरणाच्या धाग्यांवरून कस्टम्स विभागाने तस्करीच्या मोठ्या नेटवर्कचा तपास सुरू केला आहे. यामध्ये सूत्रधार, आर्थिक पुरवठादार आणि इतरांचा शोध घेतला जात असून, तस्करीची ही पद्धत रोखली नाही तर भविष्यात याच पद्धतीने अधिक मोठ्या प्रमाणावर तस्करी होण्याचा धोका असल्याचा इशाराही अधिकाऱ्यांनी दिला आहे.



**गुप्त माहितीद्वारे पकडले, सोनं तस्करीचा नवा 'जुगाड'**

मुंबई विमानतळावर ट्रान्झिट प्रवासी (एखादा प्रवासी एका देशातून किंवा शहरातून दुसऱ्या देशात/शहरात जाण्यासाठी उड्डाण घेतो, पण त्याला मधल्या एअरपोर्टवर काही वेळ थांबावे लागते - अशा प्रवाशाला ट्रान्झिट ट्रॅव्हलर किंवा ट्रान्झिट प्रवासी म्हणतात) म्हणून उतरून मग वॉशरूमचा वापर सोन्याच्या तस्करीसाठी करायचा, असा हा स्मगलिंगचा नवा प्रकार समोर आला आहे. सीमाशुल्क विभागाला गुप्त माहिती मिळाली होती की, एक ट्रान्झिट प्रवासी सोन्याच्या तस्करीमध्ये सामील आहे आणि तो मुंबई विमानतळाच्या निर्गमन (डिपार्चर) परिसरात काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याला तस्करीचा माल सोपवणार आहे. त्यानंतर अधिकाऱ्यांनी विमानतळावरील कंत्राटी कर्मचारी बी. आर. सकपाळ आणि ट्रान्झिट प्रवासी रकिबूर रहमान यांच्यावर पाळत ठेवली होती. तपासादरम्यान सकपाळ हा डिपार्चर परिसरातील वॉशरूममधून सोन्याच्या कॅप्सूल गोळा करताना आढळून आला. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडून चार सोन्याच्या कॅप्सूल जप्त करण्यात आल्या. या कॅप्सूलचे एकूण वजन १,५९० ग्रॅम असून त्यांची किंमत सुमारे २.१५ कोटी रुपये असल्याचे कस्टम्सने सांगितले.

## कांदिवलीत धावत्या बसला भीषण आग


### संपूर्ण परिसरात आगीचे लोट... वेस्टर्न एक्सप्रेस हायवेवर काय घडलं?

■मुंबई । प्रतिनिधी,

मुंबईतील कांदिवली परिसरात एक धक्कदायक घटना घडल्याची बातमी समोर आली आहे. कांदिवली पूर्व समतानगर येथील वेस्टर्न एक्स्प्रेस हायवेवर धावत्या बसला भीषण आग लागल्याचं वृत्त आहे. धावत्या डबल डेकर बसला अचानक आग लागल्याच्या या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

**डबल डेकर बसला लागली भीषण आग**

मिळालेल्या माहितीनुसार, कांदिवली पूर्व समतानगर येथील वेस्टर्न एक्स्प्रेस महामार्गावर एका धावत्या डबल डेकर बसला अचानक भीषण आग लागली. अचानक आग लागल्याने,





बसमधील प्रवासी स्वतःचा जीव वाचवण्याचा प्रयत्न करू लागले आणि लगेच बसमधून बाहेर पडले, त्यामुळे सुदैवाने कोणत्याच प्रवाशाला आपला जीव गमवावा लागला नाही. बसला आग लागल्याची माहिती मिळताच, अग्निशमल दलाचे अधिकारी तात्काळ घटनास्थळी पोहोचले आणि बऱ्याच प्रयत्नांनंतर, आग आटोक्यात आली.

**प्रवाशांची सुरक्षितता धोक्यात**

अचानक धावत्या बसला आग लागल्याचं नेमकं कारण अद्याप समोर आलेलं नाही. मात्र, सुदैवाने या घटनेत कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नसल्याचं सांगण्यात येत आहे. आता अग्निशमन दलाचे अधिकारी या घटनेचा पुढील तपास करत असल्याचं सांगितलं जात आहे. बसने अचानक पेट घेतल्याने प्रवाशांची सुरक्षितता धोक्यात आली आहे.

## मुंबईत ८७ हजार मतदारांची 'नोटा'ला पसंती





■मुंबई । प्रतिनिधी,

मुंबई महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत यंदा अनेक राजकीय दिग्गजांना पराभवाचा धक्का बसला असला, तरी ह्यनोटाह्णचा प्रभाव मात्र लक्षणीयरीत्या वाढलेला दिसून आला आहे. मुंबईतील २२७ प्रभागांमध्ये तब्बल ८७,०१३ मतदारांनी कोणालाही मतदान न करता ह्यनोटाह्णचा पर्याय निवडला आहे. मतांच्या या आकड्याने राजकीय पक्षांपुढे मोठे प्रश्नचिन्ह उभे केले असून, ह्यनोटाह्णला मिळालेल्या एकूण मतांनी निवडणुकीत पाचव्या क्रमांकाचे स्थान पटकावले आहे. प्रभाग क्रमांक २२६ मध्ये १४०४ मते नोटाला मिळाली आहेत. याशिवाय इतर दोन प्रभागांत एक हजारहून अधिक मते पडली असून, इतरत्र मतांचा टक्का चांगला आहे. नोटाला भरभरून झालेल्या मतदानावरून निवडणूक रिंगणातील उमेदवार मुंबईकरांना फारसे पसंत पडले नसल्याचे स्पष्ट होत आहे. मुंबईच्या निवडणूक रिंगणात २२७ प्रभागांतून शिवसेना ठाकरे, भाजप, शिवसेना, काँग्रेस अशा प्रमुख पक्षांच्या उमेदवारांसह इतर पक्षांचे आणि अपक्ष असे १७०० उमेदवार निवडणूक लढवत होते, तर एक कोटी तीन लाखांहून अधिक मतदार होते. निवडणूक रिंगणात मोठ्या संख्येने उमेदवार असल्याने यंदा मतदरांसमोर पर्याय उपलब्ध होते. उमेदवारांच्या कोलांटउडीवर निषेधाचे अस्त्र पालिकेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर अनेक उमेदवारांनी पक्षाचे अधिकृत तिकीट मिळवण्यासाठी एका पक्षातून दुसऱ्या पक्षात उड्या मारत उमेदवारी मिळवली होती. काही जण तर शेवटच्या दोन तासांत भलत्याच पक्षाकडून तिकीट मिळवत निवडणूक रिंगणात उतरले होते. हा राजकीय चिखल आणि उमेदवारांच्या उड्या मारण्याची वृत्ती पसंत न पडल्याने अनेक सुशिक्षित मतदारांनी निषेध म्हणून नोटाला मतदान केले असणार आहे. त्यामुळेच आतापर्यंतची सर्वाधिक मते नोटाला मिळाल्याचा अंदाज राजकीय वतुर्ळात व्यक्त होत आहे.

## तरुणीची क्रूरपणे हत्या करुन बॉडी रस्त्याच्या कडेला फेकली, नग्न अवस्थेत आढळला मृतदेह



**पहिल्यांदाच नाही दुसऱ्यांदा होणार महापौर, ४४ वर्षांपूर्वीचा इतिहास घ्या जाणून**

या प्रकरणी सुपा पोलीस ठाण्यात हत्या झाल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास अधिक प्रभावीपणे करण्यासाठी पोलिसांनी फॉरेन्सिक तज्ञांना घटनास्थळी पाचारण केले आहे. तसेच, श्वान पथकाची मदत घेण्यात येत असून, आरोपीचा माग काढण्यासाठी विविध पातळ्यांवर तपास सुरू आहे. घटनास्थळावरून आवश्यक नमुने गोळा करून त्यांची तपासणी केली जात आहे. अतिरिक्त पोलीस अधीक्षक गणेश बिरादर यांनी या प्रकरणाबाबत माहिती देताना सांगितले की, आरोपींचा शोध घेण्यासाठी पाच विशेष पोलीस पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच अन्य टेक्निकल टूल्सच्या सहाय्याने तपास वेगाने सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रत्येक शक्य त्या दिशेने तपास करण्यात येत असून आरोपींना लवकरात लवकर अटक करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यान, या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज नवसरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

■पालघर। प्रतिनिधी,

बारामती तालुक्यातील सुपा परिसरात एका तरुणीची निर्घृण हत्या करून तिचा मृतदेह रस्त्याच्या कडेला फेकून दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. खैरेपाडळ परिसरात ही घटना उघडकीस आली असून, रस्त्याच्या बाजूला नग्न अवस्थेत युवतीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून पोलिसांकडून तपास सुरु करण्यात आलाय.

**वतीवर अत्यंत क्रूरपणे हल्ला करून हत्या केल्याचा अंदाज**

घटनेची माहिती मिळताच सूपा पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिसराची पाहणी करत प्राथमिक तपास सुरू केला. प्राथमिक तपासात सदर तरुणीचे वय अंदाजे २५ ते २७ वर्षे असल्याचे समोर आले आहे. मात्र, मृत युवतीची ओळख अद्याप पटलेली नाही. तसेच, अज्ञात कारणावरून अज्ञात व्यक्तीने हत्याराच्या सहाय्याने युवतीवर अत्यंत क्रूरपणे हल्ला करून तिची हत्या केल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. मृत युवतीची ओळख पटवण्यासाठी तसेच हत्या नेमकी कशामुळे आणि कोणी केली, याचा छडा लावण्यासाठी पोलीस कसून तपास करत आहेत.

पोलिसांच्या माहितीनुसार, हत्या केल्यानंतर आरोपीने युवतीचा मृतदेह रस्त्याच्या कडेला फेकून दिला. मृतदेहाची अवस्था पाहता हत्या अतिशय क्रूरपणे करण्यात आल्याचे दिसून येत आहे. रस्त्याच्या बाजूला नग्न मृतदेह आढळल्याने ही घटना उघडकीस येताच परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. मात्र, पोलिसांनी तात्काळ परिस्थिती नियंत्रणात आणत पंचनामा करण्याची प्रक्रिया सुरू केली. या घटनेमुळे बारामती तालुक्यात खळबळ उडाली असून, नागरिकांकडून आरोपींना तातडीने अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

## न्यायालयाचे ऐतिहासिक पाऊल

### ७ वर्षाच्या मुलीवर लैंगिक अत्याचार... 'इतक्या' दिवसांतच सुनावला मृत्यूदंड

गुजरातमधील कानपरमध्ये घडलेल्या या घटनेने खळबळ उडाली होती. ४ डिसेंबर २०२५ रोजी ही घटना घडली. एका शेतमजुराची सात वर्षांची मुलगी बाहेर खेळत असताना आरोपी रेमसिंग दुडवाने तिला झुडपात नेऊन तिच्यावर अत्याचार केले. तसेच तिच्या गुप्तांगात लोखंडी रॉड घातला. यानंतर त्याने तिथून पलायन केले. ही घटना समजताच सगळीकडे खळबळ माजली आणि या घटनेची तुलना दिल्लीतील निर्भया प्रकरणाशी केली जाऊ लागली. यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य वाढले आणि पोलिसांनी त्वरित कारवाई करत आरोपीला अटक केली.

■मुंबई । प्रतिनिधी,

गुजरातच्या राजकोटमधून महत्त्वाची बातमी समोर येत आहे. ७ वर्षाच्या मुलीवर निर्भया प्रकरणाप्रमाणे अत्याचार करणाऱ्या नराधमाला राजकोट स्पेशल कोर्टाने अत्यंत कमी कालावधीत निकाल देऊन ऐतिहासिक कामगिरी केली आहे. या गुन्हेगाराने कानपर गावात ७ वर्षाच्या मुलीवर निर्भया प्रकरणाप्रमाणेच क्रूरता केली होती. न्यायालयाने या प्रकरणात जलदगतीने कारवाई केली आणि ४३ दिवसांत निकाल दिला. या निर्णयामुळे मुली आणि महिलांवर अत्याचार करणाऱ्या नराधमांना आळा बसेल अशी आशा व्यक्त केली जात आहे.

घटनेनंतर चार चा दिवसात, ८ डिसेंबर रोजी आरोपीला ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले. मात्र यासाठी त्यांना आरोपीवर गोळीबार करावा लागला. आरोपीला पकडण्यासाठी पोलिस गेले असता आरोपीने पळून जाण्याचा प्रयत्न केला. यामुळे पोलिसांना त्याच्या पायावर गोळी घालावी लागली. यानंतर फक्त ११ दिवसांतच पोलिसांनी सर्व पुराव्यांसह न्यायालयात आरोपपत्र दाखल केले.

**न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय**

राजकोट स्पेशल कोर्टाने या प्रकरणी जलदगतीने कार्यवाही करत फक्त ४३ दिवसांतच आरोपीला फाशीची सजा सुनावली. ७ वर्षाच्या मुलीवर केलला अत्याचार हा अक्षम्य असल्याचे कोटार्ने निकाल देताना सांगितले. गुजरातमध्ये गेल्या काही वर्षात अशा प्रकरणांमध्ये १०० दिवसांच्या आतच कार्यवाही झाली आहे. यातून गुजरात सरकार आणि कोटार्ने महिलांवरील अत्याचार खपवून घेतले जाणार नसल्याचा संदेश दिला आहे.

## अंगणवाडीतील चिमुकलीने शिक्षिकेला सांगितलं अन् मोठ्या दादानेच अत्याचार केल्याचं समोर

**लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये वाढ**

अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार होत असल्याच्या प्रकरणांमध्ये वाढ होत असतानाच उत्तर प्रदेशातील मेरठ येथे एका 10 वर्षीय मुलीसोबत घृणास्पद कृत्य करण्यात आल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. पीडितेचं अपहरण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्याचा आरोपींनी प्रयत्न केला. मुलगी नेहमीप्रमाणे तिच्या शाळेत जात असताना वाटेत एका व्यक्तीने तिच्याजवळ कार थांबवून तिला बळजबरीने गाडीत ओढलं. आरोपीने मुलीला सुमारे दोन तास ओलीस ठेवलं आणि तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला.

■मुंबई । प्रतिनिधी,

एका ४ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. संबंधित घटना ही केरळच्या कोझिकोड जिल्ह्यातील मुक्कम परिसरात घडल्याची माहिती आहे. २२ वर्षीय मुहम्मद मिथिलाज अशी आरोपी तरुणाची ओळख समोर आली आहे. घटनेतील पीडिता अंगणवाडीत शिकत असून तिने तिच्या शिक्षिकेला याबद्दल सांगितल्यानंतर, हे प्रकरण समोर आलं.

**प्रायव्हेट पार्टमध्ये दुखत असल्याचं सांगितलं अन्..**

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी मिथिलाजचं त्याच्या मित्राच्या घरी सतत येणं–जाणं असायचं. मात्र तो त्याच्या मित्राच्याचं



बहिणीसोबत असं घृणास्पद कृत्य करेल, याची घरातील कोणालाच कल्पना नव्हती. एके दिवशी, पीडिता अंगणवाडीत गेल्यानंतर तिच्या प्रायव्हेट पार्टमध्ये वेदना होत असल्याचं तिने तिच्या शिक्षिकेला सांगितलं. संबंधित शिक्षिकेने मुलीची विचारपूस केल्यानंतर पीडितेने तिच्यावर झालेल्या लैंगिक अत्याचाराबद्दल सांगितलं.

**"मोठ्या दादाने केलं घृणास्पद कृत्य..."**

आपल्या घरी सतत येत असलेल्या मोठ्या दादाने तिच्यासोबत घृणास्पद कृत्य केल्याचं मुलीने शिक्षिकेला सांगितलं. त्यानंतर, पीडितेच्या शिक्षिकेने आधी तिच्या पालकांना आणि नंतर पोलिसांना या प्रकरणाबाबत सांगितलं. मुलीच्या आई–वडिलांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे, पोलिसांनी गुन्हा दाखल केला आणि आरोपी मुहम्मद मिथिलाजला वायनाड येथून अटक केली.





संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# मशिदींवर लक्ष ठेवाच!



जम्मू-काश्मीरमध्ये गेल्या काही दिवसांपासून पोलीस प्रशासनाने मशिदी आणि मदरसे यांची सखोल माहिती गोळा करण्याची मोहीम हाती घेतली आहे. ४ पानांच्या अर्जाद्वारे मशिदींची विचारसरणी (देवबंदी, बरेलवी, अहल-ए-हदीस इ.), त्यांच्या व्यवस्थापन समित्यांचे तपशील, बँक खाती, निधीचे स्रोत आणि तिथे कार्यरत असलेले इमाम (मशिदीमध्ये प्रार्थना करून घेणारा) आणि मुअज्जीन (मशिदीमध्ये नमाजासाठी लोकांना अजान देऊन बोलावणारा) यांची वैयक्तिक माहिती मागवण्यात आली आहे. माहिती गोळा करण्यामागे मशिदींना मिळणारा पैसा कुठून येतो आणि त्याचा विनियोग कुठे होतो ?, यावर लक्ष ठेवणे, हा मुख्य उद्देश आहे. आतंकवादाला होणारा अर्थपुरवठा रोखण्यासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. कट्टरतावादी विचारांच्या प्रसाराला लगाम घालणे आणि धार्मिक स्थळांचा गैरवापर टाळणे, हा पोलिसांचा यामागील प्राथमिक तर्क आहे. प्रशासनाच्या मते, हा निव्वळ प्रशासकीय पारदर्शकतेचा भाग आहे. गेल्या काही काळात 'व्हाईट कॉलर' (पांढरपेशी) आतंकवादाचे मॉडेल समोर आले आहे, ज्यात काही धार्मिक स्थळांचा वापर कट्टरतावाद पसरवण्यासाठी किंवा आतंकवादी कारवायांना सर्व प्रकारचे साहाय्य पुरवण्यासाठी केला गेल्याचा संशय आहे. माहिती गोळा केल्यानंतर प्रशासन या धार्मिक स्थळांना 'जिओ-टॅगिंग'द्वारे (कोणतीही माहिती जी.पी.एस. (ग्लोबल पोझिशनिंग सिस्टिम) आधारित अक्षांश आणि रेखांश यांच्याशी जोडणे) जोडू शकते. यामुळे भविष्यात कोणत्याही संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे सोपे होईल. स्थानिक पातळीवर नॅशनल कॉन्फरन्स, पीडीपी आदी पक्ष आणि 'मुत्तहिदा मजलीस-ए-उलेमा'सारख्या संघटना यांनी या प्रक्रियेला विरोध केला आहे. त्यांच्या मते इमाम आणि कर्मचारी यांचे वैयक्तिक तपशील, सामाजिक माध्यमांवरील खात्यांची माहिती अन् पारपत्राचा क्रमांक मागणे हे खासगीपणाचा अधिकार डावलणारा आहे. केवळ एकाच धर्माच्या स्थळांना लक्ष्य केले जात आहे. यामुळे लोकांमध्ये भीती आणि अविश्वासाचे वातावरण निर्माण होत आहे. दुसरीकडे या प्रक्रियेचे पडसाद आंतरराष्ट्रीय स्तरावर, विशेषतः पाकिस्तानातही उमटले आहेत. जम्मू-काश्मीरमधील पालटत्या वातावरणात प्रशासनाने उचललेले हे पाऊल केवळ माहिती संकलनापुरते मर्यादित नसून ते सुरक्षेच्या नव्या धोरणाचा भाग असल्याचे दिसते. खोर्‍यातील आतंकवादाचा चेहरा आता पालटत आहे. बंदूकधारी आतंकवाद्यांपेक्षा 'हायब्रीड आतंकवादी' (जी व्यक्ती उघडपणे आतंकवादी नसते; पण संधी मिळाल्यावर आतंकवादी कृत्य करते किंवा त्यासाठी साहाय्य करते) आणि 'ओव्हर ग्राऊंड वर्कर्स' (जी व्यक्ती उघडपणे सामान्य नागरिक म्हणून रहाते; पण गुपचूप आतंकवादी गटांना साहाय्य करते) अशांचे आव्हान मोठे आहे. अनेकदा अशा घटकांना आश्रय मिळवण्यासाठी किंवा त्यांच्या विचारसरणीचा प्रचार करण्यासाठी मशिदी आणि मदरसे यांचा आधार घेतला जातो, असा सुरक्षायंत्रणांचा दावा आहे. या पार्श्वभूमीवर मशिदींच्या व्यवस्थापनाची कुंडली मांडणे हा 'प्रतिबंधात्मक सुरक्षे'चा एक भाग मानला जात आहे. मदरसे आणि मशिदी यांची माहिती गोळा करण्यामागे एक तांत्रिक कारण हेही आहे की, अनेक संस्था अधिकृतपणे नोंदणीकृत नाहीत. त्यांच्याकडे येणारा परकीय निधी अनेकदा अनधिकृत मार्गाने येतो. जेव्हा शासन या निधीचा हिशोब मागते, तेव्हा त्याला 'धार्मिक हस्तक्षेप' म्हटले जाते. मुळात ही प्रक्रिया ३५ वर्षांपूर्वीच चालू झाली असती, तर काश्मीरमधील आतंकवादावर लगाम घालण्यावर मोठे यश मिळाले असते. वर्ष १९९० मध्ये या मशिदींवरील भोंग्यांवरूनच हिंदूंना त्यांच्या बायका आणि संपत्ती सोडून जाण्याच्या धमक्या देण्यात आल्या होत्या. आजही देशात कुठेही हिंदूंच्या धार्मिक मिरवणुकांवर आक्रमणे होतात, तर ती मशिदीच्या ठिकाणीच होतात. तेथून दगडफेक केली जाते. येथे आधीपासूनच दगड गोळा करून ठेवलेले असतात. त्यामुळे काश्मीरसह भारतात शांतता टिकवायची असेल, तर 'मशिदींच्या भिंतींच्या आत काय चालले आहे?', हे पहाण्यासह तेथील मुसलमानांच्या माणसांच्या मनात काय चालले आहे, हे समजून घेणेही महत्त्वाचे आहे. पाकिस्तानने या प्रक्रियेवर तीव्र आक्षेप घेत याला 'धार्मिक स्वातंत्र्याचे उल्लंघन' म्हटले आहे; मात्र पाकिस्तानचा हा कळवळा नैसर्गिक नसून राजकीय हेतूने प्रेरित आहे. काश्मीरमधील स्थानिक सूत्रांना आंतरराष्ट्रीय व्यासपिठावर नेऊन भारताची प्रतिमा इस्लामविरोधी देश (इस्लामोफोबिक) म्हणून रंगवण्याचा त्याचा जुना डाव आहे. खोर्‍यातील असंतोष धगधगत ठेवणे, ही पाकिस्तानची हतबलता आहे; कारण शांतता प्रस्थापित झाल्यास त्यांची 'काश्मीर राग' आळवण्याची संधी हिरावली जाईल. पाकिस्तानने घेतलेला आक्षेप हा निव्वळ दांभिकपणा आहे. स्वतःच्या देशात मशिदी आणि मदरसे यांमध्ये होणार्‍या स्फोटांकडे दुर्लक्ष करणारा पाकिस्तान, जेव्हा भारताच्या अंतर्गत सुरक्षेच्या निर्णयावर बोलतो, तेव्हा तो केवळ जागतिक स्तरावर 'व्हिक्टिम कार्ड' (स्वतःला पीडित दाखवून सहानुभूती मिळवणे) खेळण्याचा प्रयत्न असतो. काश्मीरमधील मशिदींची माहिती घेतल्याने तेथील स्थानिक तरुणांची माथी भडकवणे पाकिस्तानला कठीण जाणार आहे, हेच त्याच्या पोटदुखीचे खरे कारण आहे. तांत्रिकदृष्ट्या कोणत्याही राज्यातील पोलीस कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी अशा प्रकारची माहिती गोळा करू शकतात. उत्तरप्रदेश आणि उत्तराखंड या राज्यांनी यापूर्वीच मदरशांच्या सर्वेक्षणाचे पाऊल उचलले आहे. 'एक देश, एक नियम' यानुसार सर्व धार्मिक संस्थांचे प्रमाणीकरण होणे प्रशासकीयदृष्ट्या सोपे पडेल. जम्मू-काश्मीरची परिस्थिती 'विशेष' मानली जाते; कारण तिथे सीमापार आतंकवादाचा थेट प्रभाव आहे; मात्र उर्वरित भारतात असा निर्णय घेतल्यास त्याला व्यापक धार्मिक संघर्षाचे स्वरूप प्राप्त होऊ शकते. राज्यघटनेतील 'धर्मनिरपेक्षता' आणि 'धार्मिक स्वायत्तता' या सूत्रांवरून सर्वोच्च न्यायालयात मोठी कायदेशीर लढाई उभी राहू शकते; कारण भारतीय राज्यघटनेचे कलम २५ आणि २६ प्रत्येक नागरिकाला आपापल्या धर्माचे पालन आणि व्यवस्थापन करण्याचे स्वातंत्र्य देतात. त्यामुळे पुराव्याविना सरसकट सर्व धार्मिक स्थळांची माहिती गोळा करण्याचा प्रयत्न न्यायालयात टिकणे कठीण जाऊ शकते. त्यामुळे केंद्र सरकारला राज्यघटनेत पालट करून मशिदींवर लक्ष ठेवण्याचा निर्णय घ्यावा लागणार आहे; मात्र असा निर्णय घेण्याचे धाडस सरकार दाखवणार का? हाच प्रश्न आहे.

# आता कसोटी अपेक्षापूर्तीची

अखेर नऊ वर्षांनंतर का होईना मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका झाल्या. महानगरपालिका निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर शहरात वेगळीच हवा तयार होते. कोण जिंकलं, कोण हरलं, कोण सत्तेत आलं झ यावर चर्चा तर होतेच, पण त्याहून जास्त चर्चा होते ती सामान्य माणसाच्या अपेक्षांची. कारण ही निवडणूक म्हणजे फक्त राजकीय पक्षांचा खेळ नाही, तर आपल्या रोजच्या आयुष्याशी थेट जोडलेली गोष्ट आहे. आपण चालतो ते रस्ते, आपण पितो ते पाणी, आपण प्रवास करतो ती बस, रुग्ण जातो ते रुग्णालय, मुलं जातात ती शाळा झ हे सगळं पालिकेवर अवलंबून असतं. त्यामुळे निकाल लागल्यानंतर लोकांच्या मनात आनंद, आशा, अपेक्षा आणि थोडी भीती – अशा सगळ्या भावना एकत्र येतात.




मुंबईकरांना फक्त इतकंच हवं असतं - आयुष्य थोडं तरी सोपं व्हावं. सकाळी कामावर जाताना अडचण नको, पाणी-वीज वेळेवर मिळावं, आजारी पडलो तर चांगला इलाज मिळावा, मुलांना नीट शिक्षण मिळावं आणि शहरात सुरक्षितपणे, सन्मानाने जगता यावं. सत्तेत आलेल्यांनी हे करून दाखवलं, तरच लोक मनापासून म्हणतील - 'आमचं मत खरंच कामी आलं'

सगळ्यात आधी लोकांना वाटतं, 'आपण दिलेलं मत वाया गेलं नाही.' मतदानाच्या दिवशी रांगेत उभं राहून, ऊन-पावसाची तमा न बाळगता दिलेलं मत आता कुणाच्या तरी हातात सत्ता देतं, ही जाणीव लोकांना समाधान देते. प्रचारात उमेदवारांनी आणि पक्षांनी जी वचने दिली, ती आता तरी पूर्ण होतील, अशी आशा सगळ्यांच्या मनात असते. आपल्या भागातले खड्डे बुजतील, रस्ते नीट होतील, पाणी वेळेवर येईल, कचरा रोज उचलला जाईल, असं साधं-सोपं जगणं लोकांना हवं असतं.

पावसाळ्यात रस्त्यावर पाणी साचू नये, घरात पाणी घुसू नये, गटारं तुंबू नयेत, दुर्गंधी कमी व्हावी ही सामान्य माणसाची सगळ्यात मोठी अपेक्षा असते. आजारी पडलो तर जवळच दवाखाना असावा, तिथे डॉक्टर मिळावा, औषध मिळावं, रांगेत तासन्तास उभं राहावं लागू नये, असं त्यांना वाटतं. शाळेत शिक्षक वेळेवर यावेत, मुलांना चांगलं शिक्षण मिळावं, शाळा स्वच्छ असावी, चांगल्या पद्धतीचे शिक्षण घेऊन एक चांगली पिढी तयार व्हावी एवढंच त्यांना हवं असतं.

झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांसाठी निवडणूक म्हणजे आयुष्य बदलण्याची आशा असते. पक्कं घर, नळाचं पाणी, शौचालय, वीज, ड्रेनेज, कचरा उचलण्याची नीट सोय हे सगळं त्यांना फार महत्त्वाचं वाटतं. योजना जाहीर होतात, पण त्या प्रत्यक्षात याव्यात, फक्त कागदावरच राहू नयेत, अशी त्यांची इच्छा असते. पुनर्वसन करताना लोकांना त्रास न होता, सन्मानाने घर मिळावं, अशी त्यांची अपेक्षा असते.

तरुण मुलं-मुलींना नोकरीची, कामधंद्याची, शिकण्याच्या संधींची फार अपेक्षा असते. शहरात ट्रेन-बस नीट चालाव्यात, गर्दी कमी व्हावी, प्रवास थोडा तरी सोपा व्हावा, असं त्यांना वाटतं. सरकारी कामं ऑनलाइन सोपी व्हावीत, प्रमाणपत्र, परवाना, जन्मदाखले, मृत्यू प्रमाणपत्र, कर यासाठी ऑफिसात चकरा माराव्या लागू नयेत, अशी त्यांची इच्छा असते. शहर आधुनिक व्हावं, पण त्याचा फायदा फक्त श्रीमंतांनाच नाही, तर सामान्य माणसालाही व्हावा, हीच त्यांची खरी अपेक्षा असते.महिलांना सगळ्यात जास्त हवं असतं ते म्हणजे सुरक्षितता. रस्त्यावर दिवे असावेत, बस-रेल्वेत सुरक्षित वाटावं, रात्री उशिरा घरी जाताना भीती वाटू नये, असं त्यांना वाटतं. सार्वजनिक शौचालय स्वच्छ असावीत, दवाखान्यात महिलांसाठी नीट सोय असावी, गरोदर महिलांची नीट काळजी घेतली जावी, अशी त्यांची अपेक्षा असते. महिलांना कामधंद्याच्या संधी मिळाव्यात, प्रशिक्षण मिळावं, स्वतःच्या पायावर उभं राहता यावं, हीसुद्धा मोठी अपेक्षा असते. वृद्ध लोकांना शांत आणि सुरक्षित आयुष्य हवं असतं. चालायला चांगले रस्ते, बसायला बाक, बागा, मोफत किंवा स्वस्त औषधं, सरकारी दवाखान्यात नीट इलाज एवढंच त्यांना पुरेसं वाटतं. त्यांच्याशी आदरानं वागलं जावं, कुठल्याही कामासाठी त्यांना हेलपाटे मारावे लागू नयेत, असं त्यांना वाटतं.

दुकानदार, छोटे व्यावसायिक, फेरीवाले यांनाही पालिकेकडून खूप अपेक्षा असतात. कर प्रणाली सोपी असावी, दंड उगाच लावू नये, लायसन्स पटकन मिळावं, बाजार स्वच्छ आणि नीटनेटका असावा, असं त्यांना वाटतं. ग्राहक येण्यासाठी रस्ता, लाईट, पार्किंग यांची सोय चांगली असावी, अशी त्यांची अपेक्षा असते. पण एवढ्या सगळ्या अपेक्षांबरोबरच लोकांच्या मनात थोडी भीती आणि शंका असतेच. 'निवडणुकीत जे बोलले, ते खरंच करतील का?' 'फक्त भाषणच राहील की काम होईल?' 'भ्रष्टाचार कमी होईल का?' असे प्रश्न लोक स्वतःलाच विचारतात. आधीही अनेक वेळा मोठी वचने दिली गेली, पण सगळी पूर्ण झालीच असं नाही. म्हणून आता लोक म्हणतात – आम्हाला मोठी भाषणं नकोत, आम्हाला काम करून दाखवा.

आज लोक जास्त जागरूक झाले आहेत. सोशल मीडियावर फोटो टाकून रस्त्याचे खड्डे दाखवतात, कचऱ्याचे ढीग दाखवतात, पाण्याच्या समस्यांबद्दल लिहितात. चुकीचं वाटलं तर आवाज उठवतात. त्यामुळे सत्तेत बसलेल्यांवर आता जास्त दबाव असतो.

शेवटी मुंबईकरांना फार अवघड काही नको असतं. त्यांना फक्त इतकंच हवं असतं – आयुष्य थोडं तरी सोपं व्हावं. सकाळी कामावर जाताना अडचण नको, पाणी-वीज वेळेवर मिळावं, आजारी पडलो तर चांगला इलाज मिळावा, मुलांना नीट शिक्षण मिळावं, आणि शहरात सुरक्षितपणे, सन्मानाने जगता यावं. सत्तेत आलेल्यांनी हे करून दाखवलं, तरच लोक मनापासून म्हणतील झ आमचं मत खरंच कामी आलं. मात्र हे खरं होईल का नाही ते येणारा काळच ठरवेल!

# भक्तसखा अर्जुन

भगवंत अर्जुनाला 'निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्' असे म्हणाले. 'सव्यसाची' म्हणजे दोन्ही हात वापरू शकणारा. दिवंगत प्राचार्य डॉ. ह. श्री. साने सर स्वामी माधवनाथांबद्दल बोलताना म्हणाले होते, 'हाताचे डावे-उजवे न पाहता, ओंजळीच्या दोन्ही हातांना सुगंधित करणारे आपले व्यक्तिमत्त्व सर्वांना प्रेरणादायी आहे.' भगवंतांनी आपल्या अवतार कार्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी भक्तसखा अर्जुनाची निवड का केली, हे पाहण्यासारखे आहे. सज्जनांचे रक्षण, दुष्टांचा संहार, धर्माचे संस्थापन यांसाठी मी अवतार धारण करतो, असे भगवंत सांगतात. तुकोबा म्हणतात, 'ये दशे चरित्र केले नारायणे। रांधता गोधने रखिताहे।। हे सोंग सारीले या रूपे श्रीअनंते। पुढे ही बहुत करणे आहे।। तुका म्हणे धर्मसंस्थापने। केला नारायणे अवतार।।' अर्जुन अप्रतिम योद्धा होता. 'नित्य बोध सुधा' या ग्रंथात स्वामी मकरंदनाथ अर्जुनाच्या गुणांचे वर्णन करतात. शिकवणाऱ्याच्या मनस्थितीमध्ये जाऊन शिकणे, हे अर्जुनाचे वैशिष्ट्य होते. भगवंतांनी केलेल्या उपदेशाचे यथायोग्य पालनही अर्जुनाने केले. अर्जुन गुणवान होता. अत्यंत सरळ बुद्धीचा आणि ऋजू अंतःकरणाचा होता. अर्जुनाने किती तरी मोठे पराक्रम केले; पण त्याचा गर्व केला नाही. अर्जुनाजवळ शिष्याचेही गुण होते. तो विश्वास ठेवणारा, श्रद्धावान, मत्सररहित होता. भगवंतांनी 'अनसूयवे' म्हणजे 'असूयारहित' असे त्याचे कौतुक केले आहे. कर्णाशी शत्रुत्व असले, तरी कधी त्याचा मत्सर केला नाही. युद्धप्रसंगीही आत्मकल्याणाच्या गोष्टी भगवंतांकडून जाणून घेण्यास तो उत्सुक होता. भगवंतांच्या हृदयात शिरण्याचे कौशल्य त्याच्याकडे होते. एका बाजूला वीरासारखे वर्तन असूनही त्याच्या कृतीत मार्दव होते. अर्जुनाच्या निमित्ताने भगवंतांची दिव्य वाणी गीतेच्या रूपाने सर्व जगाला प्राप्त झाली. विश्वरूपाचे दर्शन झाल्यावर अर्जुन भगवंताला पुन्हा पुन्हा नमस्कार करू लागला, ह्यतुमचे सामर्थ्य अनंत, अपार आणि पराक्रम अतुलनीय असून तुम्ही सर्व काही आहात, हे समजून आले. मी आपल्याला हे कृष्णा, हे यादवा, सख्या असे एकेरी नावाने संबोधले. तुमचा व्यापक महिमा न जाणल्यामुळे माझ्याकडून चुकीने तुमच्याशी मर्यादा सोडून वर्तन झाले,' असे म्हणत क्षमा मागू लागला.



# दावोसचा संदेश

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या दावोसला गेलेत. तेथे ते जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीस हजर राहणार. मुख्यमंत्री फडणवीस यांनी १६ लाख कोटींचे करार करण्याचे उद्दिष्ट ठेवले. सरकारने फडणवीस यांच्या नेतृत्वाचा उपयोग देशात गुंतवणूक आणण्यासाठी करण्याचा प्रयत्न केला आहे.

गेल्या वर्षी मुख्यमंत्री दावोसला उपस्थित राहिले होते तेव्हा आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांवर टीका केली होती, की ही गुंतवणूक देशी कंपन्यांचीच आहे. केवळ ११ कंपन्या परदेशी आहेत. पण या राजकीय आरोप-प्रत्यारोपांना बाजूला ठेवले तरीही एक बाब लक्षात येते ती ही, की मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रचंड गुंतवणूक आणली आहे आणि त्याचा उपयोग भारतातील बेरोजगारी दूर हटवण्यासाठी करण्यात येईल. गेल्या वर्षी १६ लाख कोटी रुपयांचे एमओयू करण्यात आले होते. त्यापैकी प्रत्यक्षात ७२ टक्के अमलात आले आहेत. यंदाही मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात गुंतवणूक आणण्यावर भर राहणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. यंदा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हेही जागतिक आर्थिक मंचाचे आकर्षण असणार आहेत. कारण त्यांच्यासमवेत शिष्टमंडळ हे सर्वात मोठे असेल असे सांगण्यात येते. पण ट्रम्प यांनी अनेक देशांना टॅरिफ लावून जेरीस आणले आहे आणि त्यामुळे त्यांच्या वाटाघाटीत काय होते हे महत्त्वाचे आहे. पण विषय आपला महाराष्ट्राचा चालला आहे, तर फडणवीस सांगतात की यंदा गतवर्षीपेक्षाही जास्त गुंतवणूक आणणार आहे ते विशेष महत्त्वाचे आहे. मुळात दावोस गुंतवणूक ही जागतिक अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम करते. जिथे देश आणि राज्ये, जसे की महाराष्ट्र किंवा मध्य प्रदेश राज्यातून जागतिक कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी प्रचंड प्रयत्न होतात. त्यामुळे रोजगार निर्मिती, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि शाश्वत विकासाला चालना मिळते. भू-राजकीय तणाव आणि आर्थिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर भारत हे एक प्रमुख गुंतवणूक ठिकाण म्हणून उदयास येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमी सांगतात, की भारत हे गुतवणूकदारांचे अत्यंत आकर्षक आणि विश्वासाचे ठिकाण म्हणून सध्या उदयाला आले आहे. त्याचाच परिणाम म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा दावोस दौरा आहे.

कॅनडा आणि मेक्सिकोपाठोपाठ अमेरिकेने भारतावरही टॅरिफ लावण्याचा आणि तोही भरमसाट टॅरिफ लावण्याचा निर्णय ट्रम्प यांनी घेतल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्याला विशेष महत्त्व आहे. कारण मुख्यमंत्री फडणवीस यांनी दावोस येथून जी गुंतवणूक आणतील त्यातून येथे रोजगार निर्माण होतील आणि त्याचा परिणाम येथील तरुणांना रोजगारांचा लाभ देण्यात होईल. त्याचबरोबर महाराष्ट्र हे प्रगत राज्य आहे आणि त्याचे पडसाद राज्याच्या औद्योगिक वाटचालीत दिसून येतात. मुख्यमंत्र्यांचा दावोस दौरा हे त्याचेच फल आहे. मुख्यमंत्र्यांच्या या दावोस दौऱ्याने स्टील म्हणजे पोलाद, केमिकल्स आणि सिमेंट बॅटरी या उद्योगात मोठी गुंतवणूक होईल. मुख्यमंत्री फडणवीस यांच्याच काळात महाराष्ट्र पाचव्या क्रमांकावरून पहिल्या क्रमांकावर आला आणि त्याचे एकमेव कारण होते ते औद्योगिक गुंतवणूक. राज्याची अर्थव्यवस्था एक लाख कोटी डॉलर्सवर नेण्यासाठी राज्यात प्रचंड गुंतवणूक येण्याची गरज आहे आणि ती मुख्यमंत्री फडणवीसच आणू शकतात, असा विश्वास सर्वांनाच आहे. गेल्या काही वर्षांत भारतातील काही औद्योगिक राज्यांच्या सरकारांनी उदा. महाराष्ट्र, आसाम यांनी उच्चाधिकार शिष्टमंडळे दावोसला पाठवली आहेत. त्यात संबंधित राज्यांचे मुख्यमंत्रीही आहेत आणि हाच पॅटर्न यंदाही अमलात आणला आहे. ज्या क्षेत्रात गुंतवणूक केली जाणार आहे, ती क्षेत्रे आहेत स्वच्छ ऊर्जा, सागरी अन्नाची निर्यात आणि तत्सम क्षेत्रे. स्विस कंपन्यांना आपल्याकडे आकर्षित करून घेण्यात मुख्यमंत्री यशस्वी होतील यात काही शंका नाही.

महाराष्ट्राची स्पर्धा ही आसाम आणि मध्य प्रदेश या अन्य राज्यांशी असली तरीही त्यात विखार नाही. केवळ आपल्या राज्यासाठी जास्तीत जास्त गुंतवणूक आणणे आणि आपल्या लोकांना चांगल्यातील चांगले जीवन बहाल करणे हेच उद्दिष्ट आहे. कारण शेवटी राज्यकर्त्यांचे उद्दिष्ट तर आपल्या जनतेचे कल्याण करणे हेच असते. यंदा दावोस येथील भारताचे प्रतिनिधित्व भारतातील महाराष्ट्राचे फडणवीस तसेच आणि तेलंगणाचे रेवंथ रेड्डीशिवाय आसामचे विस्वकर्मा आणि झारखंडचे हेमंत सोरेन करतील. प्रत्येक राज्य त्याच्या गरजेच्या दृष्टीने औद्योगिक गुंतवणूक आणण्याचा प्रयत्न करणार आहे. पण सर्वात महत्त्व आहे ते केवळ महाराष्ट्रालाच. कारण हे राज्य प्रगत आहे आणि गेल्या वर्षी त्याने विक्रमी गुंतवणूक आणली आहे. आणखी एक विशेष, की ट्रम्प यांच्या कारकिर्दीला एक वर्ष पूर्ण होत आहे. अशावेळी ते जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीत सहभागी होत आहेत, हे निश्चित आहे, की ट्रम्प यांनी टॅरिफचा वापर शस्त्र म्हणून अनेक देशांविरुद्ध केला आहे आणि त्यात भारतही आला. केवळ देशांतर्गत उत्पादकांना संरक्षण देण्यासाठी त्यांनी हे प्रचंड टॅरिफचे शस्त्र उगारले. यात त्यांचा राजकीय उद्देष्यही आहे. जास्तीत जास्त रोजगार अमेरिकन लोकांनाच मिळावा हा त्यांचा उद्देश स्पष्ट आहे. वाढती जागतिक गुंतागुंत आणि भू-राजकीय तुकडे करणाच्या पार्श्वभूमीवर आर्थिक स्पर्धात्मकता यांच्या परिप्रेक्ष्यात जागतिक आर्थिक मंच जागतिक नेत्यांना भारतातील राजकीय नेत्यांना इमपार्शल म्हणजे तटस्थ मंच उपलब्ध करून देईल अशी आशा वाटते. मुख्यमंत्री फडणवीस यांची आणखी एक परीक्षा आहे आणि त्यात ते कितपत यशस्वी होतात हे काळच दाखवेल. पण त्यांचे कर्तृत्व पाहता ते यातही यशस्वी होतील यात काही शंका नाही. ट्रम्प यांच्या एकांगीवादाला फडणवीस यांचे यश हेच उत्तर आहे. जागतिक आर्थिक मंचाची बैठक ही जग कोणत्या दिशेने जात आहे याविषयी अधिक आहे. सामान्य गुंतवणुकीसाठी जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीतील निर्णय हे परिणामकारक नसतात पण ते खरे असतात आणि त्यातून जे धोरणात्मक संदेश दिले जातात त्यांच्यासाठी ते वास्तविक असतात.

# सरोगसीचा बोकाळलेला बेकायदा बाजार!




सरोगेट माता उपलब्ध करण्याचा धक्कादायक प्रकार मुंबईत नुकताच उघडकीस आल्यानंतर वंधत्वाच्या समस्येचे सामाजिक परिणामही समोर आले आहेत. वंधत्वाची समस्या ही आपल्याकडे एखादे आजारपण, कमतरता, रोग, व्यंग अशा अर्थाने घेतली जाते. सोबतच या समस्येला पौरुषत्वाशीही जोडल्या गेल्याने संबंधित समस्येचा विषय लोकलज्जा, इभ्रत अवमान आणि आत्मविवंचनेच्या कक्षेतही येतो. मुळात वंधत्व ही एकीकडे समस्या मानली जात असताना दुसरीकडे अपत्यहीन लग्नाचे प्रकारही आपल्याच समाज समुदायात वाढत आहेत. त्यानंतर कायदेशीर, सामाजिक बंधनही नकोच असल्याने 'लिव्ह इन रिलेशनशीप'चे समर्थनही केले जात आहे. समाजातील प्रत्येक बदलाचे सकारात्मक, नकारात्मक परिणाम असतातच. या बदलात कायदेशीर आणि बेकायदा पद्धतीही असतातच. 'सरोगसी' विषयीही तेच झाले आहे. सरोगसी ही एक वैद्यकीय व्यवस्था आहे. यात एक महिला (सरोगेट माता) दुर्सया व्यक्ती किंवा जोडप्यासाठी (इच्छित पालक) स्वतःच्या गर्भाशयात मूल वाढवून ते जन्माला घालते. जन्मानंतर ते बाळ इच्छित पालकांचे होते. यात वैद्यकीय साधनांचा वापर करून गर्भ तयार केला जातो, हा गर्भ सरोगेट आईच्या गर्भाशयात पुढील वाढीसाठी ठेवला जातो. बाळाचा जन्म झाल्यावर त्या बाळाचा कायदेशीर ताबा संबंधित मातापित्यांकडे जातो. वंधत्वाची समस्या असलेल्या, आजारपण किंवा कोणत्या इतर कारणांमुळे बाळाला जन्म देण्यास असमर्थ असलेल्या तसेच बाळाची अपेक्षा असलेल्यांसाठी कायदेशीर सरोगसी हा पर्याय आहे. चोरट्या पद्धतीने बेकायदा सरोगसी करण्यामागील कारणे ही सामाजिक मागसलेपणात आहेत. सरोगसी म्हणजे काहीतरी अनैतिक कृत्य असल्याचा समज आहेच. शिवाय ही एक विरळ गोष्ट असल्याने त्याविषयी पुरेशी माहिती, जागरुकता आणि समाजभान नाही.

मूल होणे ही बाब आपल्याकडे केवळ लैंगिक आणि नैतिक-अनैतिकतेच्या दृष्टीनेच पाहिली जात असल्याने बेकायदा सरोगसीविषयी बरेच गैरसमज आहेत. सरोगसीला कायदेशीर मान्यता असली तरी सामाजिक मान्यता पुरेशी नाही. सरोगसी खुलेपणाने मान्य करायला आजही आपला समाज धजावत नाही. तर सरोगसी ही काहीतरी विचित्र अनैतिक बाब असल्याचा भ्रम आहे. यामुळेच एकवेळ सामाजिक मान्यता नसलेल्या अनैतिक मार्गाने किंवा छुप्या पद्धतीने गर्भधारणा करण्याच्या नावाने महिलांचे होणारे शोषण वाढत आहे. यातही वंधत्वाचे सामाजिक परिणाम हा गुंतागुंतीचा, भावनिक आणि संवेदनशील असा विषय आहे, त्यामुळे महिलाही सामाजिक दबावाला बळी पडून अशा बेकायदा गर्भधारणेसाठी तयार होत असल्याने त्यांच्या शोषणाची संधी समाजातील काही घटकांना मिळत आहे. गर्भधारणेचा विषय पुरुषांमध्ये पौरुषत्व आणि महिलांमध्ये पूर्णत्वाच्या पद्धतीने हाताळला जात असल्याने सरोगसीच्या बेकायदा बाजाराला मोकळे रान मिळत आहे. सरोगसीमध्ये कायदेशीर करार, वैद्यकीय उपचार, गर्भ हस्तांतरण, गर्भधारणा आणि प्रसुती, पालकत्वाची मालकी आदी कायदेशीर प्रक्रिया असतात. या कायदेशीर प्रक्रियांविषयी गैरसमज आणि कौटुंबिक गोपनीयतेच्या मुद्द्यामुळे बेकायदा सरोगसीला पोषक वातावरण मिळते. कर्करोगग्रस्त किंवा तत्सम गर्भाशयाचे किंवा इतर दुर्धर आजार असलेल्या, पुरुष किंवा सक्षम असलेल्या एकल पालकांनाही सरोगसीतून आईवडील, पालक होण्याची इच्छा पूर्ण करता येते. त्यामुळेच बेकायदा सरोगसीचा प्रकार करणार्‍यांकडून पालक होण्याची इच्छा असलेल्यांना लक्ष्य केले जाते.

मुंबईतील सहार विमानतळावरून पोलिसांनी दोन महिलांना अशाच प्रकरणात ताब्यात घेतले. या दोन महिला बँकॉकहून आल्या असल्याचे स्पष्ट झाल्यावर तपास सुरू करून पोलिसांनी गुन्हा दाखल केला. अटकेत असलेल्या महिलांपैकी एक महिला बेकायदा सरोगसीसाठी मध्यस्थाचे काम करणारी असून तिने दुर्सया महिलेला बेकायदा सरोगसीतील 'एग डोनर' होण्यासाठी प्रवृत्त केल्याचा आरोप आहे. बेकायदा सरोगसी उपलब्ध करून देणारे रॅकेट कार्यरत असल्याची शक्यता यातून पुढे आली आहे. हे रॅकेट बाळाची अपेक्षा असलेल्यांना हेरून त्यांना बेकायदा 'एग डोनर' पुरवण्याचे काम करत होते. यात आर्थिक व्यवहार होत असल्याचे उघड आहे. प्रश्न असा आहे की सरोगसीचे कायदेशीर मार्ग उपलब्ध असताना बेकायदा पद्धतीने सरोगसीचा पर्याय का स्वीकारला जात आहे. कायदेशीर प्रक्रियेत आवश्यक गोपनीयता बाळगली जात नसल्याची भीती संतानोच्छुकांना वाटत असावी. सोबतच यातील सामाजिक संदर्भही त्याला कारण असावेत. एखाद्या माहीत नसलेल्या व्यक्तीचे बीज आपल्या गर्भात ठेवून त्याची वाढ होऊन त्याचे पालकत्व स्वीकारण्याइतका खुलेपणा आपल्या समाजात अजूनही आलेला नाही. वंधत्वाची कारणे पुरुषांमध्ये असल्यास ती लपवण्यासाठी बरेचदा बेकायदा सरोगसीचा पर्याय स्वीकारला जातो. सोबतच वंधत्वाच्या कारणांमध्ये आपल्याकडे पुरुषांच्या तुलनेत महिलांनाच दोष दिला जात असल्याने बेकायदा सरोगसीसाठी पोषक वातावरण मिळते. आपल्याकडील सामाजिक आणि कुटुंब व्यवस्थेतील या कमतरतेमुळे बेकायदा सरोगसीच्या जाळ्यात अपत्यइच्छूक अडकत आहेत. तसेच त्यांची आर्थिक आणि मानसिक फसवणूक होत आहे. सामान्य बाळंतपणासारखेच सरोगसीकडेही पाहाता यावे, हा खुलेपणा मान्य करण्यासाठी भारतीय समाजमनाला अजून कित्येक दशके वाट पाहावी लागणार आहे. हा खुलेपणा मान्य केल्यास गर्भ, बीज या नवनिर्मितीच्या प्रक्रियेतील शारीर घटकांचा बेकायदा व्यवसाय कमी होईल.

# महापौरपदाची आरक्षण सोडत गुरुवारी

## राज्यातील २९ महानगरपालिकांचे चित्र ३१ जानेवारीपूर्वी स्पष्ट होणार

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीचा फैसला लागल्यानंतर आता सर्वांना वेध लागले आहेत ते महापौरपदाचे. त्यातच आता येत्या गुरुवारी म्हणजे २२ जानेवारीला सर्व २९ महानगरपालिकांमध्ये महापौर कोण होणार? याची आरक्षण सोडत निघणार आहे. त्यानंतरच मुंबईसह सर्व महानगरपालिकांमध्ये महापौरपदी कुणाची वर्णी लागू शकते हे निश्चित होणार आहे. त्यामुळे महापौरपद कुणाला मिळणार ही उत्सुकता ३१ जानेवारीपर्यंत कायम राहणार आहे.

राज्यातील २९ मनपांमधील महापौरपदाच्या आरक्षणासंदर्भात महत्त्वाच्या हालचाली सुरू झाल्या असून, या विषयावर तोडगा काढण्यासाठी आणि आरक्षण ठरवण्यासाठी नगरविकास विभागाकडून उच्चस्तरीय बैठक बोलावण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने याबाबत अधिकृत पत्रक जारी केले असून, ही बैठक २२ जानेवारीला सकाळी ११ वाजता मंत्रालयात होणार आहे. या बैठकीचे अध्यक्षस्थान राज्याचे नगरविकास मंत्री भूषवणार आहेत.




शासनाच्या या पत्रानुसार, राज्यातील २९ मनपांमध्ये महापौरपदासाठी आरक्षण निश्चित करण्याबाबत सध्या निर्माण झालेल्या पेचावर चर्चा करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. मंत्रालयातील परिषद सभागृहात, सहाव्या मजल्यावर ही बैठक पार पडणार असून, त्यामध्ये संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती अपेक्षित आहे. महापौरपदाचे आरक्षण हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सत्तास्थापनेसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे या बैठकीत आरक्षण सोडत काय निघते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

नगरविकास विभागाच्या उपसचिव अनिरुद्ध जेवळीकर यांनी हे पत्र जारी केले असून, त्यात स्पष्ट करण्यात आले आहे की, आरक्षण निश्चितीचा निर्णय नगरविकास मंत्र्यांच्या निर्देशानुसार घेतला जाणार आहे. या बैठकीत होणाऱ्या चर्चेनंतर महापौरपदाच्या आरक्षणाबाबत अंतिम सोडत काढली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे महापालिकेतील सत्तास्थापनेसाठी हा निर्णय निर्णायक ठरणार आहे.

या पत्राची प्रत मुख्यमंत्री कार्यालय, उपमुख्यमंत्री कार्यालय, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव तसेच संबंधित वरिष्ठ सचिवांना देण्यात आली आहे. यावरून राज्य सरकार या विषयाकडे किती गांभीर्याने पाहते, हे स्पष्ट होते. महापालिका निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर अनेक शहरांमध्ये महापौरपदाच्या आरक्षणावरून राजकीय चर्चा आणि मतभेद निर्माण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

### मुंबईच्या महापौरपदाकडे सर्वांचे लक्ष

मुंबई महापालिकेत महापौर कोणत्या पक्षाचा आणि कोण होणार, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. आता, २२ जानेवारी रोजी होणाऱ्या आरक्षण सोडतीतूनच विजयी नगरसेवकांपैकी कोण महापौर होणार, हे समजणार आहे. कारण, ज्या प्रवगार्साठी हे आरक्षण जाहीर होईल, त्याच प्रवगार्तील व्यक्तीला महापौरपदाची लॉटरी लागणार आहे. मुंबईत एसटी प्रवगार्साठी आरक्षण सोडत जाहीर झाल्यास मोठी उलथापालथ मुंबईत पाहायला मिळेल. कारण, येथील एसटी प्रवगार्तील दोन्ही जागेवर ठाकरेंचेच उमेदवार विजयी झाले आहेत.

### अशी असेल 'महापौर'पदाची आरक्षण सोडत प्रक्रिया

- महापौरपदाचे आरक्षण चक्राकार पद्धतीने निघणार आहे.
- साधारणतः मागील २० वर्षांचे आरक्षण लक्षात घेतले जाणार आहे.
- जे आरक्षण याआधी त्या महापालिकेत होते, ते वगळता इतर आरक्षणाची चिठ्ठी असणार आहे.
- एससी, एसटी, ओबीसी आणि खुला वर्ग, त्यामध्ये पन्नास टक्के महिला आरक्षण असे आरक्षणाचे प्रवर्ग असणार आहेत.
- त्या महापालिकेमध्ये याआधी कोणते आरक्षण झालेले आहे, ती चिठ्ठी बाजूला करून उर्वरित आरक्षणाच्या चिठ्ठ्या टाकल्या जाणार आहेत.
- या चिठ्ठ्या बॉक्समध्ये टाकताना सर्वांना दाखवल्या जातील, त्यानंतर पारदर्शक असणाऱ्या बॉक्समध्ये त्या टाकल्या जातील.
- सर्व चिठ्ठ्या एकत्र झाल्यानंतर त्यातून एक-एक चिठ्ठी बाहेर काढून आरक्षण सोडत जाहीर केली जाणार आहे.
- त्यानंतर पुन्हा ५० टक्के महिला आरक्षणाच्या चिठ्ठ्या टाकून महिला आरक्षण काढले जाणार आहे.
- या पद्धतीने राज्यातील २९ महानगरपालिकांच्या महापौरपदाचे आरक्षण २२ जानेवारीला सकाळी ११ वाजता मंत्रालयातील परिषद सभागृहामध्ये निश्चित होणार आहे.

# गॅस गळती... बालकासह ५ जण जखमी



**■डोंबिवली । प्रतिनिधी,**

डोंबिवली पूर्वेच्या नवनीत नगरमध्ये घरगुती वापराच्या एलपीजी सिलेंडरमधून वायू गळती झाली. या गॅस गळतीमुळे केतन देढिया (३५), मेहुल वासाड (४०), विजय घोर (४५), हरिश लोढाया (५०) आणि हरिश यांचा मुलगा पार्श्व लोढाया (७) हे पाच जण जखमी झाले.

केतन देढिया यांच्या घरात गॅस गळती झाली. गॅस गळतीमुळे केतन देढिया ५० टक्के भाजले. सध्या केतन देढिया यांच्यावर मुंबईत सायन येथे लोकमान्य टिळक रुग्णालयात उपचार सुरू आहेत. उर्वरित किरकोळ जखमींना आवश्यक ते उपचार करुन घरी जाण्याची परवानगी देण्यात आली आहे.

डोंबिवली पूर्वेकडे देसलेपाडा परिसरात असलेल्या नवनीतनगर गृहसंकुलातील डब्ल्यू व्ही च्या ५१० नंबरच्या फ्लॅटमध्ये राहणारे केतन देढिया यांच्या घरात गॅस गळती झाली. गळती सुरू असतानाच केतन यांनी घरातील दिवा लावला. यामुळे निर्माण झालेल्या उष्णतेमुळे स्फोट झाला. स्फोटात केतन देढिया यांच्या घराचे नुकसान झाले. केतन देढिया यांच्यासह एकूण पाच जण स्फोटामुळे जखमी झाले.

स्फोटाचा आवाज आला पाठोपाठ केतन यांच्या घराची घराची खिडकी आणि ग्रील तुटून इमारतीच्या तळमजल्यावर कोसळली. हा ढिगारा अंगावर कोसळल्यामुळे हरिश लोढाया (५०) आणि हरिश यांचा मुलगा पार्श्व लोढाया (७) हे दोघे जखमी झाले. तर गॅस गळतीमुळे झालेल्या स्फोटात केतन देढिया (३५), मेहुल वासाड (४०), विजय घोर (४५) हे ३ जण जखमी झाले.

जखमी झालेल्या पाच जणांपैकी केतन देढिया ५० टक्के भाजले आहेत तर उर्वरित चौघे किरकोळ जखमी आहेत. घडलेल्या घटनेची माहिती मिळताच मानपाडा पोलीस आणि अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी पंचनामा करुन पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली आहे.

# एकाच खोलीत पाच मृतदेह आणि ३ पिस्तुल... कपाळावर गोळ्या लागलेल्या अवस्थेत आढळल्या डेथ बॉडी



अशोक, त्याची पत्नी अंजिता, त्याची आई विद्यावती आणि त्याची दोन मुलं कार्तिक आणि देव यांचे मृतदेह एका खोलीत आढळले. सर्वांच्या कपाळावर गोळ्या लागल्या होत्या. खोलीतून तीन पिस्तूल सापडल्या. अशोक आणि त्याच्या पत्नीचा मृतदेह जमिनीवर आढळला, तर आई आणि दोन मुले बेडवर आढळली. पोलिसांच्या प्राथमिक तपासात असा संशय आहे की अशोकने आधी आई, पत्नी आणि दोन मुलांवर गोळी झाडून हत्या केली आणि नंतर आत्महत्या केली.

**■मुंबई । प्रतिनिधी,**

उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथे एकाच कुटुंबातील पाच जणांचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाल्याने परिसरात खळबळ उडाली. अशोक, त्याची पत्नी, आई आणि दोन मुलांच्या कपाळावर गोळ्या लागल्याचे आढळले. घटनास्थळावरून तीन पिस्तूल जप्त करण्यात आल्या आहेत. अशोकने आत्महत्या करण्यापूर्वी या सर्वांची हत्या केल्याचा पोलिसांना संशय आहे. दरम्यान, कर्ज आणि घरगुती तणाव यामुळे अशोकने हे पाऊल उचलले का याचा पोलिस तपास करत आहेत.

**का उचलले टोकाचे पाऊल?**

सहारनपूर पोलिस कुटुंबातील वादातून रागाच्या भरात गोळीबार झाला का? या शक्यतेचा तपास करत आहेत. बाहेरील व्यक्तीने घरात घुसून हा गुन्हा केला आहे का याचाही ते तपास करत आहेत. कुटुंबातील सदस्यांशी कोणतेही वाद, आर्थिक व्यवहार किंवा वैर आहे का याचाही तपास सुरु आहे.जवळच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमधील फुटेज तपासले जात आहेत आणि शेजाऱ्यांची चौकशी केली जात आहे. कुटुंबातील कर्ज, नोकरीशी संबंधित ताण, घरगुती वाद किंवा मानसिक दबाव यामुळे हे भयानक पाऊल उचलले गेले असावे, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

**'असे' होते अशोकचे कुटुंबिय**

मृत अशोक हा नाकुर तहसीलदार कार्यालयात काम करत होता. वडीलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या जागी ही नोकरी त्याला मिळाली होती. त्याचा मुलगा देव हा शहरातील एका खाजगी शाळेत नववीत शिकत होता, तर दुसरा मुलगा कार्तिक दहावीत शिकत होता. शेजाऱ्यांच्या मते, कुटुंब शांत होते आणि त्यांचे कोणाशीही मतभेद नव्हते. माहिती मिळताच, पोलिस अधिकारी आणि फॉरेन्सिक टीम घटनास्थळी पोहोचली. त्यांनी घर सील केले आणि सर्व मोबाईल फोन जप्त केले. या प्रकरणाची सर्व बाजूंनी चौकशी पोलिस करत आहेत.

# प्रियकरासोबत पाहिल्याने ५ वर्षीय मुलाला आईनेच छतावरुन फेकलं, पोलीस पतीने पुरावे गोळा केले

**■मुंबई । प्रतिनिधी,**

प्रियकरासोबत पाहिल्याने ५ वर्षीय मुलाला आईनेच छतावरुन फेकल्याची धक्कादायक घटना एप्रिल २०२३ मध्ये घडली होती. या प्रकरणात आता ग्वालियरमधील चिमुकल्याची हत्या केल्याप्रकरणी न्यायलयाने आईला दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. पतीनेच यासंबंधीचे पुरावे न्यायालयाता सादर केले आहेत. दरम्यान, या घटनेतील प्रियकर पुराव्याअभावी निर्दोष सुटलाय. या घटनेने केवळ ग्वालियरच नव्हे, तर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली होती. ही घटना २८ एप्रिल २०२३ रोजी ग्वालियर शहरातील थाटीपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली होती.



या संभाषणाची ऑडिओ-व्हिडीओ रेकॉर्डिंग ध्यान सिंह यांनी करून ठेवली. तसेच घरात लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेजही त्यांनी मिळवले. सर्व पुरावे एकत्र केल्यानंतर ध्यान सिंह यांनी थाटीपूर पोलीस ठाण्यात पत्नीविरोधात तक्रार दाखल केली. त्या आधारे पोलिसांनी ज्योती राठोड आणि तिच्या प्रियकराविरोधात गुन्हा दाखल करून तपास पूर्ण केला आणि न्यायालयात आरोपपत्र सादर केले. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान विजय शर्मा यांनी पोलिसांच्या वतीने बाजू मांडली. सर्व पुरावे आणि साक्षी तपासल्यानंतर न्यायालयाने आई ज्योती राठोड हिला दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. मात्र, पुरेसे ठोस पुरावे उपलब्ध नसल्याने तिच्या प्रियकराची निर्दोष मुक्तता करण्यात आली.

अधिकची माहिती अशी की, ज्योती राठोड ही तिच्या शेजारी राहणाऱ्या प्रियकरासोबत घराच्या छतावर होती. याचवेळी तिचा पाच वर्षांचा मुलगा अचानक छतावर आला. मुलाने आपल्या आईला प्रियकराच्या मिठीत पाहिले. आपले अनैतिक प्रेमसंबंध उघडकीस येतील आणि मुलगा ही गोष्ट वडिलांना सांगेल, या भीतीने ज्योती राठोड आणि तिच्या प्रियकराने मिळून मुलाला दोन मजल्यांवरून खाली फेकून दिल्याचे तपासात समोर आले.

दोन मजल्यांवरून खाली पडल्याने तो चिमुकला रस्त्यावर गंभीर अवस्थेत तडफडत होता. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, या संपूर्ण काळात आई ज्योती राठोड मुलाला पाहण्यासाठी रुग्णालयातही पोहोचली नव्हती. पडण्यामुळे मुलाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. जयारोग्य रुग्णालयात त्याच्यावर एक दिवस उपचार सुरू होते. मात्र, २९ एप्रिल २०२३ रोजी उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. सुरुवातीला हा प्रकार अपघात असल्याचेच मानले जात होते. घरातील सदस्य आणि मृत मुलाचे वडील, जे पोलीस कॉन्स्टेबल ध्यान सिंह आहेत, यांनाही निष्काळजीपणामुळे मुलाचा पाय घसरून तो खाली पडला असावा, असे वाटत होते. त्यामुळे सुरुवातीच्या तपासातही कोणताही संशय व्यक्त करण्यात आला नव्हता.

मात्र, घटनेनंतर तब्बल १५ दिवसांनी आई ज्योती राठोडला पश्चात्ताप झाला. तिने आपल्या पती ध्यान सिंह यांच्याशी बोलताना, "माझ्याकडून खूप मोठी चूक झाली आहे," असे सांगितले. या वाक्यामुळे ध्यान सिंह यांना संशय आला. त्यांनी पत्नीला विश्वासात घेऊन अधिक विचारपूस केली. त्यानंतर ज्योती पूर्णपणे कोसळली आणि तिने संपूर्ण घटना पतीसमोर कबूल केली.

# चुलत भावाशी अनैतिक संबंध, पण नंतर शरीर संबंध ठेवण्यास नकार, मृतदेह अर्धनग्न अवस्थेत शेतात...

**■सोलापूर। प्रतिनिधी,**

माळशिरस तालुक्यातील वाफेगाव परिसरात उसाच्या शेताशेजारील मोकळ्या जागेत सापडलेल्या महिलेच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी माळशिरस येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने महत्वपूर्ण निर्णय देत आरोपीला जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. चुलत भावासोबतचे अनैतिक संबंध थांबवल्यानंतर निर्माण झालेल्या वैमनस्यातून ही हत्या झाल्याचे न्यायालयाने निष्पन्न केले.

**घटनेत नेमकं काय घडलं होतं?**

फिर्यादी मोहन शंकर बनसोडे यांच्या पत्नीचे आरोपी शंकर सरवदे या चुलत भावाशी काही काळ अनैतिक संबंध होते. मात्र, हत्येच्या साधारण महिनाभर आधी महिलेने हे संबंध पूर्णतः तोडले. त्यानंतर आरोपी सतत तिला भेटून पुन्हा नातेसंबंध ठेवण्याचा दबाव टाकू लागला. तिने नकार दिल्यास जीव घेण्याची धमकीही दिल्याचे तपासात पुढे आले. घटनेच्या दिवशी मोहन बनसोडे कामानिमित्त घराबाहेर गेलेले असताना आरोपी शंकर सरवदे महिलेची भेट घेतली होती. त्यानंतर तिला शेतात नेऊन प्रथम तिच्यावर अत्याचार केला आणि नंतर गळा आवळून निर्दयीपणे जीव घेतला. पुरावा नष्ट करण्यासाठी आरोपीने मृतदेह अर्धनग्न अवस्थेत सोडून, कपडे दूर नेऊन फेकल्याचे समोर आले.



घटनेची तक्रार अकलूज पोलीस स्टेशनमध्ये दाखल होताच तपासाला गती मिळाली. आरोपीने स्वतःच पंचनाम्यादरम्यान घटनास्थळ दाखवून दिल्यामुळे तपास अधिक मजबूत झाला. पोलिसांनी घटनास्थळावरून जप्त केलेले महिलेचे आणि आरोपीचे कपडे फॉरेन्सिक टीमकडे पाठवले. तपास अहवालात आरोपीच्या कपड्यांवर रक्ताचे डाग आढळल्याने त्याच्याविरुद्धचा पुरावा अधिक बळकट झाला. या प्रकरणात एकूण १५ साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली. यात फियार्दीची आई, प्रत्यक्षदर्शी तसेच तपास अधिकारी यांच्या जबाबांनी आरोपीची भूमिका अधिक स्पष्ट झाली. संपूर्ण खटल्याची सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. एल. डी. हुली यांच्या न्यायालयात पार पडली.

**न्यायालयाने काय निकाल दिला?**

सर्व पुरावे, साक्षी आणि तांत्रिक तपास अहवालांचा बारकाईने अभ्यास करून न्यायालयाने आरोपी शंकर सरवदे याला दोषी ठरवले. भा.दं.वि. कलम ३०२ अन्वये त्याला आजीवन कारावास आणि २,००० रुपयांचा दंड (दंड न भरल्यास दोन महिने साधा कारावास) अशी शिक्षा सुनावण्यात आली. तसेच पुरावा नष्ट करण्याच्या गुन्ह्यासाठी भा. दं.वि. कलम २०१ अंतर्गत ३ वर्षे सश्रम कारावास आणि १,००० रुपयांचा दंड (दंड न भरल्यास एक महिना तुरुंगवास) अशी शिक्षा ठोठावली. या खटल्यात शासनतर्फे ॲड. संग्राम पाटील, ॲड. एस. ए. ढवळे आणि ॲड. एस. टी. मेवेगिरी यांनी प्रभावी युक्तिवाद करत आरोपीचा हेतू आणि गुन्हा स्पष्ट केला. फिर्यादी मोहन बनसोडे यांच्या वतीने ॲड. जी. पी. कदम यांनी न्यायालयास साहाय्य केले. या संपूर्ण प्रकरणाने स्थानिकांमध्ये मोठी खळबळ उडाली होती. अखेर न्यायालयाच्या निर्णयाने पीडितेच्या कुटुंबाला अंशतः दिलासा मिळाला आहे.

## वडिलांच्या तेराव्याच्या कार्यक्रमातच मुलाची निर्घृण हत्या!


# थेट घरात घुसून गुंडांचा हल्ला अन्...

**■मुंबई । प्रतिनिधी,**

वडिलांच्या निधनानंतर तेराव्या दिवशी मुलाची निर्घृण हत्या करण्यात आल्याची बातमी समोर आली आहे. पीडित तरुणाला गुंडांकडून धारदार शस्त्रांनी मारहाण करण्यात आली आणि त्याच त्याचा मृत्यू झाला. संबंधित प्रकरण हे उत्तर प्रदेशच्या महोबा जिल्ह्यातील असल्याची माहिती आहे. या घटनेनंतर, आरोपी घटनास्थळावरून फरार झाले.

**पोलिसांकडून प्रकरणाचा तपास सुरू**

आरडाओरडा ऐकून कुटुंबातील इतर नातेवाईक घटनास्थळी पोहोचले आणि जखमींना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं. रुग्णालयातील डॉक्टरांनी विकासला मृत घोषित केलं. तसेच, प्राथमिक उपचारानंतरही २२ वर्षीय अनिलच्या प्रकृतीत काहीच सुधारणा झाली



नसल्याने त्याला झाशी मेडिकल कॉलेजमध्ये रेफर करण्यात आलं.

मृताचा २३ वर्षीय भाऊ आकाश, ४५ वर्षीय सुरजन सिंग मुलगा नथुराम, २२ वर्षीय बाबू यांना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरू करण्यात आले आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिसांचं पथक घटनास्थळी पोहोचलं आणि त्यांनी मृतदेह ताब्यात घेऊन प्रकरणाची चौकशी सुरू केली.




### कुटुंबियांवर जीवघेणा हल्ला

संबंधित घटना ही सोमवारी (१९ जानेवारी) अजनर पोलीस स्टेशन हद्दीतील लेवा गावात घडली. विकास आणि आकाशचे वडील राम कृपाल यांच्या तेराव्याच्या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. यादरम्यान, तीन बाईकवरून आलेल्या गुंडांनी विकासवर जीवघेणा हल्ला केला. तरुणाला मारहाण होताना पाहून, त्याच्या मदतीला आलेल्या कुटुंबातील सदस्यांना आणि नातेवाईकांनाही बेदम मारहाण करण्यात आली आणि ते रक्तबंबाळ झाले. या घटनेनंतर, आरोपींनी पीडित कुटुंबियांना धमकी देऊन घटनास्थळावरून पळ काढला.

# पत्नीनं त्रासाला कंटाळून दोघांच्या मदतीनं पतीचा काढला काटा, मृतदेह रेल्वेरुळावर फेकला

**■मुंबई । प्रतिनिधी,**

छत्तीसगड मधील बालोदाबाजारमधील भोटीडीह गाव येथे एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला. पत्नीने आपल्याच पतीची निर्घृण हत्या केली. त्याच मृत तरुणाचा मृतदेह हा रेल्वे रुळावर आढळून आल्याचं सांगण्यात येत होतं. मृतदेहाचे डोके गायब झाले असता, पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला. मृताच्या पत्नीच्या सांगण्यावरून कंत्राटी किलर्सनी ही संपूर्ण घटना घडवून आणली असं सांगण्यात येत आहे. या घटनेनं परिसर हादरून गेल्याचं वृत्त आहे.

**पुरुषावर तलवारीने हल्ला करत शिर धडापासून वेगळे केले**



### महिलेनं दोघांना हाताशी धरून 'त्याचा' काटा काढला

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कुसुमने तिचे मामा राजेश भारती यांची मदत घेत दारासिंग अनंत आणि करण अनंत या दोघांशी संपर्क साधला. नंतर त्यांना ४० हजार रुपयांची सुपारी देऊन गस कुमार जोशीला मारण्याचा कट रचला. गुन्हा करण्यासाठी, कुसुम तिच्या पतीला काही बहाण्याने तिच्या मामाच्या घरी घेऊन गेली होती. त्याच ठिकाणी दोघेजण त्याच ठिकाणी उपस्थित होते. त्यांनी गस कुमारला दारू पाजली आणि नंतर बेदम मारहाण केली. नंतर तो बेशुद्ध पडला, त्याला एका गाडीत बसवले आणि सुमारे २० किमी अंतरावर हातबंध-भाटपारा रेल्वे रुळावर नेले, नंतर तलवारीने हल्ला करत मुंडकं छाटलं. त्यानंतर आरोपीने मृतदेहाचे शरीर रेल्वे ट्रॅकवर फेकून दिले.

या प्रकरणात पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका पुरुषावर तलवारीने हल्ला करत शिर धडापासून वेगळे केले. त्यानंतर ते धड रेल्वेरुळावर फेकण्यात आले होते, तर मृतदेहाचे शिर हे दुसऱ्या ठिकाणी नेऊन जमिनीत पुरण्यात आले होते, ही घटना हातबंद पोलीस ठाणे परिसरात घडली होती. या प्रकरणातील मृताचे नाव गस कुमार जोशी (वय ३९) असे आहे. तर पत्नीचं नाव कुसुम जोशी असे आहे.

**तो सारखं अनैसर्गिक शरीरसंबंध ठेवायला लावत होता**

या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पत्नीला अटक केली आहे. तिने पोलिसांना सांगितलं की, तिचा पती बराच काळ मानसिक आणि शारीरिक छळ करत होता. नंतर तिने आरोप केला की, तो तिला अनैसिर्गिक लैंगिक संबंध ठेवण्यास दबाव आणत होता. याच त्रासाला कंटाळून पीडितेनं तिच्या पतीला संपवण्याचा निर्णय घेतला होता.

**डोके सुमारे १० किमी अंतरावर नेत जमिनीत गाडले**

हा रेल्वे अपघात असल्याचे भासवण्यासाठी त्याचे डोके सुमारे १० किमी अंतरावर नेण्यात आले आणि जमिनीत गाडण्यात आले. पोलिसांच्या म्हणण्यांनुसार, हत्येवेळी पत्नी घटनास्थळी उपस्थित नव्हती, ती तिच्या मामाच्या घरी राहत होती. तर मामा आणि दोन सुपारीबाज घटनास्थळीच होते. पोलिसांनी या प्रकरणाचा घटनास्थळी धाव घेत शोध सुरु केला होता. नंतर उजव्या मनगटावर इंग्रजीत टॅटूवरून मृतदेहाची ओळख पटली होती. जवळजवळ चार दिवसांचा तपास, शोध आणि चौकशीतून पोलिसांनी हत्येचा गुन्हा उलगडत पत्नीसह सर्व आरोपींच्या मुसक्या आवळल्या.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००० १४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com